# बिट्स पिलानी गोवा कॅम्पसमध्ये रूफटॉप सौर ऊर्जा प्रणालीचे उद्घाटन




**सांकवाळ : रूफटॉप सौर ऊर्जा प्रणालीच्या उद्घाटनप्रसंगी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कांडू प्रा. मीनल कौशिक, ए. के. पाटील, प्रा. एम. के. देशमुख, कौशिक फळदेसाई व इतर.**

प्रतिनिधी
वास्को

बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसमध्ये दोन अत्याधुनिक सोलर फोटोव्होल्टेइक ऑन ग्रीड रूफटॉप सिस्टमचे उद्घाटन करण्यात आले. १०० केडब्ल्यूपी प्रणाली ए विंगवर तर सी मेसवर ५० केडब्ल्यूपी प्रणाली बसविण्यात आली आहे.

या सुविधेचे उद्घाटन गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कांडू यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा. मीनल कौशिक, ए. के. पाटील, प्रा. एम. के. देशमुख, कौशिक फळदेसाई व कॅम्पसची लीडरशिप टिम उपस्थित होती.

प्रा. एम. के. देशमुख यांनी रूफटॉप सौर ऊर्जा प्रणालीचे सादरीकरण करून दाखविले. त्यांनी सौरऊर्जा प्रणाली वापरण्याच्या फायद्यांविषयी माहिती दिली. संचालक प्रा. सुमन कांडू यांनी कॅम्पसच्या भविष्यातील प्रकल्पांविषयी माहिती दिली.